वर्ष : ०६ | अंक: ०५ | मुंबई, मंगळवार २४ डिसेंबर २०१९ ते सोमवार ३० डिसेंबर २०१९ | पृष्ठ: ४
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021
WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

PG 2 बेकायदा पार्किंगचा दंड कमी ?

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

3 → आडमुठे सरकार, संभ्रमित विरोधक
देशभर जनक्षोभ; पोलिसांची धरपकड सुरूच! ← 4

## झारखंड निवडणूक निकाल
# भाजपाला डबल धक्का
## पराभवाबरोबर दुप्पट जागाही घटल्या



**नागरिकता सुधारणा कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिकता नोंदणी या दोन कायद्यांच्या विरोधात देशभरात नागरिक रस्त्यांवर उतरले असताना, झारखंड राज्यात विधानसभा निवडणुका झाल्या. देशभरातील आंदोलनाचा या निवडणुकांवर परिणाम होणार हे निश्चितच होतं. पण, राष्ट्रीय मुद्दे वेगळे आणि विधानसभा निवडणुका वेगळ्या असतात. मतमोजणीत सुरुवातीला झारखंडमध्ये त्रिशंकू परिस्थिती निर्माण होईल, अशी चिन्हं दिसत होती. पण, शेवटी काँग्रेसनं मुसंडी मारून बहुमताच्या जवळ आपली संख्या नेली. गेली पाच वर्षे या राज्यात भाजपची सत्ता होती. पण, हा या राज्यावरही भाजपला पाणी सोडावं लागत आहे.**

भाजपच्या जाहीरनाम्यात स्थानिक मुद्दयांवर भर होता. पण, भाषणांमध्ये गृहमंत्री अमित शहा, पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय मुद्यांवर बोलताना दिसत होते. ज्या प्रमाणे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत काश्मीर आणि कलम ३७०चा मुद्दा सातत्यानं उपस्थित करण्यात आला. त्याच प्रमाणं झारखंडमध्ये सीएए आणि एनआरसी कायद्यांवरच भाजपच्या प्रचाराचा फोकस दिसून आला. असं असलं तरी, भाजपच्या पराभवाला इतरही कारणं जबाबदार आहेत. ती अशी.

***आर्थिक मंदीचा परिणाम***

देशात असलेल्या आर्थिक मंदीचा परिणाम झारखंडच्या विधानसभेत दिसला. विशेषतः झारखंडमधील औद्योगिक क्षेत्र असलेल्या धनबाद, बोकारो, जमशेदपूर या भागात अनेक कारखाने बंद पडले आहेत. कारखान्याच्या शिफ्ट रद्द झाल्या आहेत. त्यामुळं राज्यात बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. टेल्कोवर अवलंबून जवळपास १४०० कारखाने आहेत. जे छोटे मोठे स्पेअर पार्ट्स तयार करतात. या कारखान्यांवर मंदीचा परिणाम असल्यामुळं कामगारांनी भाजपच्या विरोधात कौल दिल्याचं बोललं जातंय.

***मुख्यमंत्र्यांची ढवळाढवळ***

झारखंडचे मावळते मुख्यमंत्री रघुबरदास यांनी भाजपच्या तिकिट वाटपात खूपच ढवळाढवळ केली. याचा परिणाम निवडणूक निकालांवर दिसून आला. त्यांनी अतिशय मनमानी पद्धतीनं तिकिट वाटप केलं. भाजपचे ज्येष्ठ नेते सरयू राय यांचं तिकिट कापण्यात आलं. तर, भ्रष्टाचाराचा आरोप असणारे भानू प्रताप शाही यांना तिकिट देण्यात आलं. त्यामुळं भाजपला नुकसान सोसावं लागलंय.

***जेएमएम-काँग्रेस मजबूत आघाडी***

महाराष्ट्रा प्रमाणे झारखंडमध्ये भाजप विरोधातील आघाडी अतिशय मजबूत होती. झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस यांनी कोणत्याही प्रकारे एकमेकांवर अविश्वास दाखवला नाही की, एकमेकांच्या जागा पाडण्याचं काम केलं नाही. त्यामुळं भाजपला आव्हान देणं दोन्ही पक्षांना शक्य झालं. त्या उलट भाजप रिंगणात एकटी पडली होती. रामविलास पासवान

उर्वरित पृष्ठ 2 वर




# मोदी, शाह यांच्या अहंकारी राजकारणाला जनतेनं नाकारलं - शरद पवार



***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अहंकारी राजकारणाला झारखंडच्या जनतेने नाकारलं अशी टीका राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी केली आहे. केंद्रातली सत्तेची ताकद आणि आर्थिक ताकद वापरुनही झारखंडच्या जनतेने भाजपाला स्वीकारलं नाही. त्याबद्दल मी झारखंडच्या जनतेचे धन्यवाद देतो असंही शरद पवार यांनी स्पष्ट केलं. सिल्व्हर ओक या ठिकाणी झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.***

झारखंडसह, महाराष्ट्र मध्यप्रदेश, छत्तीसगड, राज्यस्थान या पाच राज्यातून भाजपा हद्दपार झाली आहे. झारखंड या राज्यात आदिवासी व गरीब लोकांची संख्या जास्त आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारची वापरली गेलेली सत्तेची ताकद व आर्थिक ताकद न जुमानता इथल्या जनतेने भाजपाला नाकारले आहे असेही शरद पवार यांनी सांगितले.

सत्तेवर आलेल्या घटकांनी (केंद्र सरकार) योग्य पावलं उचलायची असतात. आत्ताचे सत्ताधारी परिस्थिती चिघळेल अशी भूमिका घेताना दिसत आहेत. महाराष्ट्रातून रस्ता मिळाला, त्यातूनच झारखंडमध्ये भाजपाच्या विरोधात सगळे एकत्र आले असंही वक्तव्य शरद पवार यांनी केलं. झारखंड विधानसभा निवडणुकीत जनतेने भाजपाला धडा शिकवला. इतर राज्यांमध्येही संधी मिळाल्यानंतर जनताच भाजपाला धडा शिकवेल असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे. CAA आणि NRC आणून सरकार स्वतःचं अपयश झाकण्याचा प्रयत्न करत आहे. तसंच समाजात धार्मिक अंतर वाढवण्याचाही या सरकारचा प्रयत्न आहे असाही आरोप शरद पवार यांनी केला.

# शेतकरी कर्जमाफीसाठी ३० हजार कोटींची आवश्यकता; तरतूद होणार २५ हजार कोटींची

**मुंबई - महाविकास आघाडीचे सरकार राज्यात स्थापन झाले असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बहुप्रतिक्षीत शेतकरी कर्जमाफीची घोषणा अखेर केली. त्यामुळे राज्यातील शेतकरी सुखावला आहे. मुख्यमंत्री ठाकरे यांनी २ लाख रुपयांपर्यंतचे शेतकऱ्यांचे कर्ज कोणत्याही अटीशिवाय माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. या कर्जमाफीसाठी राज्य सरकारला सुमारे ३० हजार कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे.**

येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीसाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद होण्याची शक्यता आहे. तर कर्जमाफीसाठी




हवेत ३० हजार कोटी रुपये. यावर देखील मार्ग निघाला असून आधीच्या फडणवीस सरकारच्या काळातील शेतकरी कर्जमाफीचे सुमारे ६ हजार कोटी शिल्लक आहेत. त्या पैशांचा वापर कर्जमाफीसाठी करण्यात येणार असल्याचे समजते.

शेतकरी संप आणि आंदोलने यापुढे झुकत देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना अनेक निकष लावून कर्जमाफी घोषीत केली होती. मात्र जाचक निकषांमुळे अनेक शेतकरी या कर्जमाफी योजनेत बसू शकले नव्हते. त्यातच शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणुकीत कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते.

फणडणवीस यांच्या सरकारकडून ४४ लाख

उर्वरित पृष्ठ 2 वर

# मुख्यमंत्रिपदाचा डाव हुकल्याने देवेंद्र फडणवीस वैफल्यग्रस्त - पृथ्वीराज चव्हाण



मुख्यमंत्रिपदाचा डाव हुकल्याने देवेंद्र फडणवीस वैफल्यग्रस्त झाले आहेत अशी घणाघाती टीका माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे. एवढंच नाही तर फडणवीस हे त्यांना आलेल्या वैफल्यातूनच टीका करत आहेत असंही चव्हाण यांनी म्हटलं आहे. एका मराठी वृत्तवाहिनीशी ते बोलत होते त्यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.

'नव्या सरकारला काम करण्यासाठी किमान सहा महिन्यांचा कालावधी द्यायचा असतो असा महाराष्ट्राचा संकेत आहे. मात्र विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी हा संकेत पाळला नाही. मुख्यमंत्रिपद मिळवण्याचा त्यांचा डाव हुकला त्यामुळे ते वैफल्यग्रस्त झाले आहेत. त्याच वैफल्यातून फडणवीस हे सरकारवर टीका करत आहेत ' असंही पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

# १ जानेवारीपासून ज्येष्ठांचे पास बंद!

**राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून माफक दरात प्रवास करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना पासऐवजी महामंडळाकडून आधार क्रमांकाशी जोडलेले अत्याधुनिक 'स्मार्ट कार्ड ' दिले जात आहे. जून २०१९ पासून ही सेवा सुरू असून स्मार्ट कार्डसाठी नोंदणी करण्याची मुदत ३१ डिसेंबर २०१९ अखेर आहे. ज्यांच्याकडे स्मार्ट कार्ड असेल अशाच ज्येष्ठ नागरिकांना १ जानेवारी २०२० नंतर एसटीतून प्रवास करताना तिकिटात सवलत मिळणार आहे. स्मार्ट कार्डसाठी आधार नोंदणी न केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना मात्र प्रवास करताना पूर्ण तिकीट दर द्यावा लागणार आहे.**

ज्येष्ठ नागरिकांनी स्मार्ट कार्डसाठी आधार नोंदणी केली नाही, तर त्यांना एसटीच्या तिकिटामध्ये दिली जाणारी सवलत बंद होणार आहे. जिल्हयातील १२ आगारांमध्ये आतापर्यंत १ लाख १५०० ज्येष्ठ नागरिकांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असून ५० हजारांहून अधिक ज्येष्ठांना 'स्मार्ट कार्ड'चे वितरण झाले आहे. उर्वरित स्मार्ट कार्ड ज्येष्ठांपर्यंत पोहोचविण्यासाठी महामंळडाने मोहीम गतिमान केली आहे.



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून ज्येष्ठ नागरिकांसह दिव्यांग, महात्मा गांधी समाजसेवा, आदिवासी सेवक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कारप्राप्त नागरिक तसेच अधिस्वीकृती पत्रकारांना मोफत तसेच सवलतीच्या दरात प्रवास करण्यासाठी पास दिला जातो. हा पास साध्या पद्धतीचा होता; मात्र डिजिटलायझेशनच्या

उर्वरित पृष्ठ 2 वर

# मुलग्याच्या हव्यासापोटी केले ५ महिन्यांच्या बाळाचे अपहरण
## भाईंदर पोलिसांनी २४ तासांत बाळ दिले आईच्या कुशित

**मुंबई-** कुसूम रोहित यादव (३०), रा समरशेठ बिल्डिंग मधील झोपडी, रेल्वे व्ह्यूज बिल्डिंगच्या पाठीमागे, भाईंदर पूर्व, ठाणे यांनी समक्ष पोलीस ठाण्यात हजर होऊन दिलेल्या फिर्यादीवरून नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३१२/२०१९ भादविसं कलम ३६३, ३६५, ३४ प्रमाणे तक्रार दाखल असून सदर गुन्ह्यांची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे. फिर्यादी कुसूम यादव या मुळच्या उत्तरप्रदेश येथील रहिवाशी असून त्या कामधंद्या निमित्त त्यांचे पती रोहित, मुलगी काजल (४) व मुलगा अभयसिंग (५ महिने) यांचेसह बोईसर जि. पालघर महाराष्ट्र येथे आलेले होते. त्यांचे पती कामानिमित्त मुळगांवी उत्तरप्रदेश येथे निघून गेल्याने फिर्यादी त्यांच्या दोन्ही लहान मुलांच्या उदरनिर्वाहासाठी कामधंद्याच्या शोधात १ महिन्यापूर्वी भाईंदर पूर्व येथे आल्या होत्या. भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन नजीक सुरू असलेल्या समरशेठ बिल्डिंगच्या ठिकाणी त्यांची संगिता नावाच्या महिलेशी ओळख झाली. फिर्यादीला उदरनिर्वाहासाठी कामधंदा नसल्याने संगिताने तिच्या दोन्ही मुलांसह कामधंदा मिळेपर्यंत तिचे सोबत राहण्यास सांगितल्यावरुन तिच्या दोन्ही लहान मुलांसह संगिता व तिच्यासोबत असलेला तिचा पति संजू नावाचा इसम संगिताच्या झोपडीमध्ये राहात होती. १७-१२-२०१९ रोजी सकाळी ९ वाजता सुमारास फिर्यादी तिची मुलगी काजल व लहान मुलगा अभयसिंग यांना संगिताकडे ठेवून भाजीमार्केट येथील बफींगचे गाळपामध्ये कामाव गेली व त्यानंतर दुपारी २ वाजता कामावरुन पुन्हा घरी येऊन मुलगा अभयसिंग यांस दूध पाजून पुन्हा कामच्या ठिकाणी गेल्या. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता कामावरुन घरी आल्यावर अभयसिंग व संगिता दिसून आले नाहीत म्हणून तिने तिची मुलगी काजल व बांधकामाचे साईडवरील इतर लोकांकडे चौकशी केली असता ४ वाजता संगिता व सोनू यांनी फिर्यादीच्या लहान मुलाचे अपहरण करून पलायन केल्याचे समजले. तिने तत्काळ नवघर पोलीस ठाणे येथे जाऊन तक्रार नमूद केली. तपास करताना संशयीत इसमांचे मोबाईल बाबत तांत्रिक माहिती मिळवून सोनू नावाचे इसमास उमरोली येथून ताब्यात घेऊन यांस विश्वासात घेऊन व सातत्याने विचारपूस करून सोनूचे ताब्यातील मोबाईल मिळून आलेल्या मोबाईल मधील तांत्रिक माहिती प्राप्त करून तात्काळ पथक रवाना करून संगिता नावाच्या महिलेचा काही एक ठावठिकाणा नसताना आरोपी संगिता व अपहृत बालक अभयसिंग उर्फ विजय यांना मु.पो. बोधडी, ता. किनवट, जि. नांदेड येथून ताब्यात घेण्यात आले. सदरची कामगिरी मा. शिवाजी राठोड, पोलिस अधीक्षक, ठाणे ग्रामीण संजयकुमार पाटील, नवघर पोलिस स्टेशनचे पोलिस अधीक्षक प्रकाश बिराजदार, अपर पोलिस अधीक्षक ठाणे ग्रामीण, मा. शशिकांत भोसले, भाईंदर विभाग व वरिष्ठ पोलिस संपतराव पाटील, सहा. पो. निरी व सपोनि पोटे हे पुढील गुन्ह्याचा तपास करीत आहेत.



# देवनारमध्ये कचरा आणखी दोन वर्षे?

**मुंबई-** देवनार कचराभूमी येत्या ३१ डिसेंबपर्यंत शास्त्रोक्त पद्धतीने बंद करण्याची उच्च न्यायालयाने दिलेली मुदत पाळणे कठीण असल्याचे सांगत मुंबई महापालिकेने पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याठिकाणी कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती करण्याचा प्रकल्प कार्यान्वित होण्यास वेळ लागणार असून तोपर्यंत मुंबईच्या कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून या कचराभूमीला आणखी दोन वर्षे मुदतवाढ देण्याची मागणी पालिकेने केली आहे. देवनार होणार आहे, तर दुसरा टप्पा त्यानंतर एक वर्षांने कार्यान्वित होईल. परंतु अशा प्रकारच्या प्रकल्पांचे कंत्राट देण्याची अंतिम प्रक्रिया होईपर्यंत वेळ लागतो. शिवाय सध्या मुंबईत प्रतिदिवशी जमा होणाऱ्या एकूण कचऱ्यापैकी ६८०० म्हणजेच ७६ टक्के मेट्रिक टन कचऱ्याची कांजूरमार्ग येथील कचराभूमीवर शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जाते. उर्वरित कचऱ्याची देवनार कचराभूमीवर उघड्यावर विल्हेवाट लावली जाते. मात्र ही कचराभूमीही सद्य:स्थितीला बंद करण्यात आली, तर



कचराभूमी शास्त्रोक्त पद्धतीने बंद करण्यासाठी उच्च न्यायालयाने पालिकेला ३१ डिसेंबर २०१९ पर्यंतची मुदत दिली होती. ही मुदत वाढवून देण्यासाठी पालिकेने ॲड्. अनिल साखरे यांच्यामार्फत याचिका केली आहे. बुधवारी या याचिकेवर सुनावणी झाली. तसेच ही मुदतवाढ का मागण्यात येत आहे यामागची परिस्थिती न्यायालयाला सांगण्यात आली. देवनार कचराभूमी शास्त्रोक्त बंद केल्यानंतर तेथे कचऱ्यापासून ऊर्जानिर्मितीचा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. दोन टप्प्यांत हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी जागतिक पातळीवरील ई-निविदा नुकत्याच काढण्यात आल्या आहेत. प्रकल्पाचा पहिला टप्पा नोव्हेंबर २०२२ मध्ये पूर्ण मुंबईकरांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होईल. देवनार कचराभूमीवर अशा पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे प्रमाण कमी झाले असले तरी निर्मिती पातळीवर कचऱ्याचे सुका आणि ओला असे विलगीकरण झाल्यास हे प्रमाण शून्यावर येईल.

मात्र लोकांमध्ये अद्याप ती जागरूकता आलेली नसल्याने निर्मिती पातळीवर कचऱ्याचे १०० टक्के विलगीकरण होण्यासाठी बराच वेळ लागणार आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर आणि मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून देवनार कचराभूमीवर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास दोन वर्षे मुदतवाढ देण्याची मागणी पालिकेतर्फे करण्यात आली.

# प्रकल्पांची कासवगती वाढीव लोकलफेऱ्यांच्या मुळावर?

**मुंबई-** मुंबई उपनगरी रेल्वेमार्गावरील प्रवास सुकर होण्यासाठी लोकलफेऱ्या वाढवण्याचा पर्याय असला तरी, मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या 'एमयूटीपी-२' आणि 'एमयूटीपी-३' या प्रकल्पांच्या संथ उभारणीमुळे त्यात अडथळे येत आहेत. एमयूटीपी-२ मधील महत्त्वाचा ठाणे ते दिवा पाचवा-सहावा मार्ग गेल्या १० वर्षांत पूर्ण झालेला नाही. तर मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील उपनगरीय प्रवाशांना फायदेशीर ठरणाऱ्या एमयूटीपी-३ मधील प्रकल्पांनाही तीन वर्षांत मुहूर्त मिळालेला नाही.

सकाळी गर्दीच्या वेळी अंबरनाथ, बदलापूर ते ठाणे येथून मुंबईच्या दिशेने लोकल प्रवास जीवघेणा होतो. गर्दीमुळे लोकल गाड्यांत प्रवेश न मिळाल्याने कित्येक जण दरवाजाजवळ लटकून प्रवास करतात. वर्षाला शेकडो प्रवासी लोकल गाड्यांमधून पडून मृत्युमुखी किंवा जखमी होतात. हा प्रवास सुकर होण्यासाठी मोठ्या संख्येने लोकल फेऱ्यांत वाढ झालेली नाही. ठाणे ते दिवा पाचवा-सहावा मार्ग पूर्ण झाल्यास लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी स्वतंत्र मार्ग मिळेल आणि अतिरिक्त लोकल फेऱ्या वाढवणे शक्य होणार असल्याचा दावा मध्य रेल्वे प्रशासन आणि प्रकल्प पूर्ण करणारे एमआरव्हीसी (मुंबई रेल्वे विकास महामंडळ)करत आले आहे. या प्रकल्पाला २००८ साली मंजुरी मिळाल्यानंतर अतिक्रमण, तांत्रिक समस्या, जागेची तसेच निधीची कमतरता यामुळे प्रकल्प रखडला. प्रकल्पाची किंमतही ११५ कोटी रुपयांवरून थेट ४४० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. आता पुढील वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले असले तरीही त्याला आणखी एक ते दोन वर्षे लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ठाणे ते दिवा पाचवा-सहावा मार्गामुळे १०० पेक्षा अतिरिक्त लोकल फेऱ्या टप्प्याटप्प्यात वाढवू शकतो. परंतु कामच रखडल्याने फेऱ्या वाढवण्याचे स्वप्न दूरच राहिले आहे.

हीच परिस्थीती एमयूटीपी-३ मधील प्रकल्पांचीही आहे. डिसेंबर २०१६ मध्ये १० हजार ९४७ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला मंजुरी मिळाली. विरार ते डहाणू चौपदरीकरण, पनवेल ते कर्जत नवीन उपनगरीय दुहेरी मार्ग, ऐरोली ते कळवा उन्नत मार्ग, ४७ वातानुकूलित लोकलसारखे महत्त्वाचे प्रकल्प आहेत. निधीअभावी प्रकल्पांची कामे पुढे सरकू शकली नाही. यातील ऐरोली ते कळवा उन्नत मार्गादरम्यान असलेले दिघा स्थानकाशिवाय एकाही मार्गाचे काम सुरू झालेले नाही. या मार्गामुळे ठाणेऐवजी कळवा स्थानकातून नवी मुंबईला जाण्यासाठी अतिरिक्त मार्ग उपलब्ध होऊन लोकल गाड्या व फेऱ्याही मिळतील. तर ठाणे स्थानकावरील ताणही कमी होईल. पनवेल ते कर्जतमुळेही फेऱ्या वाढवण्यास मदत मिळणार आहे. यामध्ये सध्या निविदा प्रक्रिया सुरूच असल्याचे रेल्वेतील सूत्रांनी सांगितले. प्रकल्पांना मंजुरी मिळाल्यानंतर पाच ते सहा वर्षांत त्यांचे काम पूर्ण होणे अपेक्षित असते. मात्र त्याला आणखी विलंब होणार असल्याचे स्पष्टच आहे.

# आरे कारशेडवरून शिवसेना-भाजपमध्ये खडाजंगी

**मुंबई-** मुंबईतील आरे येथील मेट्रोच्या कारशेडला स्थगिती देण्यावरून गुरुवारी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या आमदारांमध्ये चकमक उडाली. माझा मेट्रो कारशेडला परवानगी देण्यास विरोध होता, परंतु पक्षप्रमुखांचा आदेश पाळण्यासाठी आम्ही तोंड दाबून बुक्क्याचा मार खात होतो, असे विधान माजी राज्यमंत्री रवींद्र वाईकर यांनी केले. विधानसभेमध्ये पुरवणी मागण्यांवर वाईकर बोलत होते. मागील सरकारने आरे कॉलनीत मेट्रो कार शेडला परवानगी दिली होती. त्यासाठी शेकडो झाडे रातोरात तोडण्यात आली होती. महाविकास आघाडी सरकारने सूत्रे स्वीकारताच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मेट्रो कार शेडला स्थगिती दिली आणि पर्यायी जागेचा शोध घेण्याचे निर्देश दिले आहेत. पुरवणी मागण्यांवर बोलताना वाईकर यांनी आरेमधील आदिवासी पाडे आणि विविध ठिकाणी असलेल्या १८५ एकर भूखंडांवर बेकायदा बांधकामे पुनर्विकसित करण्याची भूमिका मांडली. त्यावर भाजपचे अतुल भातखळकर यांनी मागील सरकारमध्ये असताना विरोध का केला नाही. डीपी बनवला तेव्हा तुम्ही मंत्री होता, तेव्हा गप्प का बसला होता, असा सवाल केला. त्यावर वाईकर म्हणाले, राज्यमंत्र्यांना फार अधिकार



नसतात आणि गेली पाच वर्षे आम्ही तोंड दाबून बुक्क्याचा मार खात होतो. कारण, आम्ही शिवसेनाप्रमुखांचा आदेश पाळणारे शिवसैनिक होतो. या चकमकीत माजी मंत्री आशीष शेलार यांनी उडी घेतली. आरेतील भूखंड हडप करण्याचा हा डाव असल्याचा आरोप केला. आरेला वन करण्याची भूमिका बदलली काय, असा सवालही त्यांनी केला. त्यांना उत्तर देण्यासाठी शिवसेनेचे सुनील प्रभू सरसावले आणि आरेला वन विभागाचा दर्जा देण्याच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# पोलीस आयुक्तालयाची प्रतीक्षाच; मंत्रिमंडळ विस्तारानंतरच निर्णय होण्याची शक्यता

**पालघर-** पालघर जिल्ह्यातील आणि विशेषत: वसई तालुक्यात वाढत असलेल्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या सरकारतर्फे आयुक्तांच्या नेमणुकीचा निर्णय अद्याप प्रतीक्षेत आहे, मात्र नवीन सरकार स्थापन होऊन मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर तसेच जिल्हा परिषद निवडणुकीनंतरच याबाबतचा निर्णय घेतला जाईल, असे खात्रीलायक सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

मीरा-भाईंदर आणि वसई-विरार परिसर अखत्यारीत नवीन पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याचा शासन निर्णय होऊन तीन महिन्यांचा कार्यकाळ उलटला असला तरी नवीन आयुक्तालयासाठी पोलीस आयुक्तांची नेमणूक न झाल्याने या क्षेत्रातील सर्व कारभार अजूनही पालघर पोलीस अधीक्षक कार्यालयातून सुरू आहेत.

मीरा-भाईंदर आणि वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिकीकरणामुळे अस्तित्वात असलेल्या लहान-मोठ्या उद्योगांमुळे परिसरात कामगारांची संख्या वाढत असल्याने या परिसरात गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी या दोन महानगरपालिका कार्यक्षेत्राकरिता स्वतंत्र आयुक्तालय



उभारण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली होती.

पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रातील मीरा रोड, काशिमीरा, नया नगर, नवघर, भाईंदर आणि उत्तन ही सहा पोलीस ठाणी तसेच पालघर पोलीस अधीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील वसई, विरार, नालासोपारा, माणिकपूर, वालीव, अर्नाळा, तुळींज मिळून एकूण १३ ठाणे नियोजित मीरा-भाईंदर व वसई-विरार आयुक्तालयाला वर्ग झाली. त्याचबरोबर या आयुक्तालयाअंतर्गत काशिगाव, खारीगाव, पेल्हार, आचोळे, मांडवी, बोळींज आणि नायगाव ही सात नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता दिली.

# बेकायदा पार्किंगचा दंड कमी?

**मुंबई- सार्वजनिक वाहनतळाच्या ५०० मीटरच्या आत गाड्या पार्किंग करणाऱ्यांकडून पाच ते पंधरा हजार रुपयांपर्यंत दंड वसूल करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेला मागे घ्यावा लागण्याची शक्यता आहे. वाहनतळ प्राधिकरणाने दंडाच्या भल्या मोठ्या रकमेबद्दल पालिकेला फटकारल्यानंतर आता दंडाची रक्कम कमी करण्याचा विचार पालिका प्रशासन करीत आहे. दंडाची रक्कम नक्की किती असावी हे अद्याप निश्चित झालेले नसले तरी ती थेट एक हजार रुपयांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे.**

रस्त्यावर कशाही पद्धतीने गाड्या उभ्या करणाऱ्या वाहनचालकांना शिस्त लागावी म्हणून पालिका आयुक्त प्रवीण परदेशी यांनी दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला होता. ७ जुलैपासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली. यानुसार सध्या पालिकेच्या सार्वजनिक वाहनतळांपासून ५०० मीटरच्या आत रस्त्यावर गाडी उभी केल्यास पाच ते दहा हजार रुपये दंड आकारण्यात येत आहे. यात दुचाकीसाठी पाच हजार रुपये दंड तर चारचाकीसाठी दहा हजार रुपये दंड करण्यात आला होता. सर्वसामान्य मुंबईकरांसाठी ही दंडाची रक्कम खूप जास्त होती. त्यामुळे या निर्णयाला सुरुवातीपासूनच खूप विरोध होत होता.गेल्या कित्येक वर्षांपासून राहत्या इमारतीच्या खालीच रस्त्यावर गाडी उभी करणाऱ्या वाहनचालकांचा या निर्णयाला विरोध होता. तसेच सार्वजनिक वाहनतळावर गाडी उभी करून परत घरापर्यंत चालत येणे ज्येष्ठ नागरिकांसाठी गैरसोयीचे असल्याच्याही तक्रारी लोकांकडून येऊ लागल्या होत्या. त्यातच वाहनतळ प्राधिकरणाने पालिकेला या दंडाच्या रकमेवरून फटकारले



होते. १० हजार रुपये दंड वसूल करण्याचे पालिकेला अधिकारच नाही. तसेच, गाड्या उचलून नेण्याचेही अधिकार पालिकेला नसल्याचे प्राधिकरणाने म्हटले होते. त्यामुळे पालिका प्रशासनासमोर पेच निर्माण झाला होता. त्यामुळे आता दंडाची रक्कम कमी करण्याचा विचार पालिका करीत असल्याची माहिती पालिकेच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी दिली. मात्र ही रक्कम नक्की किती असावी याबाबत अद्याप अंतिम निर्णय झाला नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, केवळ मोठ्या रस्त्यावरील दंडाची रक्कम कमी होण्याची शक्यताही अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

दंडाची रक्कम ठरवण्यासाठी विविध सूत्र तपासून पाहिली जात आहेत. सार्वजनिक वाहनतळावर गाडी उभी करण्यासाठी जे दर पालिकेमार्फत आकारले जातात, त्याच्या साधारण चार ते पाच पट दंडच आकारला जाण्याची शक्यता आहे. मुंबईमध्ये पार्किंगचे दर ए, बी व सी या तीन प्रकारात घेतले जातात. येथील दर तासासाठी २०, ४० व ६० असे अनुक्रमे आहेत. त्यामुळे चोवीस तासासाठी जास्तीत जास्त २०० रुपये आकारले जातात.

# पश्चिम रेल्वेवर अर्धवातानुकूलित लोकलच्या चाचणीला मंजुरी

**मुंबई–** पश्चिम रेल्वेवर सहा डबे वातानुकूलित व सहा डबे साधारण अशा बारा डब्यांच्या उपनगरी रेल्वेच्या चाचणीला रेल्वेच्या रिसर्च डिझाईन स्टॅण्डर्ड ऑर्गनायझेनने (आरडीएसओ) मंजुरी दिली आहे. त्याची चाचणी पुढील आठवड्यापासून करण्याचा विचार केला जात आहे.

पश्चिम रेल्वेवर वातानुकूलित लोकल दाखल होताच सामान्य लोकलच्या दररोजच्या बारा फेऱ्यांवर गदा आली. त्यामुळे सामान्य लोकलच्या प्रवाशांचा रोष पत्करावा लागला. तसेच वातानुकूलित लोकलला मिळणारा कमी प्रतिसाद पाहता रेल्वेमंत्री पीयूष गोयल यांनी अर्धवातानुकूलित लोकल चालवण्याच्या सूचना रेल्वे प्रशासनाला केल्या होत्या. त्यानुसार प्रशासनाकडून चाचपणीही केली जात होती. अखेर पश्चिम रेल्वेने बारा डब्यांपैकी सहा डबे वातानुकूलित असलेल्या अर्धवातानुकूलित लोकल चाचणीचा प्रस्ताव तयार करून त्याला मंजुरी मिळाल्याची माहिती मुख्य जनसंपर्क अधिकारी रवींद्र भाकर यांनी दिली. या लोकलच्या चाचण्या पुढील आठवड्यापासून सुरू करण्याचा विचार करीत आहोत.



परंतु त्याआधी बारा डब्यांपैकी तीन डबेच वातानुकूलित केल्या जाणाऱ्या दुसऱ्या चाचणीचा प्रस्तावही असून त्याची मंजुरीही घेण्याचा प्रयत्न आहे. त्याला मंजुरी मिळाली तर सहा डबे वातानुकूलित व सहा डबे साधारण असलेल्या बारा डब्यांची लोकलची चाचणी घेतली जाणार नाही, असेही स्पष्ट केले. सध्या पश्चिम रेल्वेवर चार वातानुकूलित लोकल असून यातील दोन लोकल सेवेत आहेत. उर्वरित लोकलपैकी एका वातानुकूलित लोकलचे काही डबे काढून ते सामान्य लोकल गाडीला जोडून अर्धवातानुकूलित लोकल चालवण्यात येणार आहे. बारा डब्यांमधील जास्त डबे वातानुकूलित जोडले तर त्यालाही कमी प्रतिसाद मिळण्याची भीती रेल्वेला आहे. त्यामुळे कमी डबे वातानुकूलित ठेवून अर्धवातानुकूलित लोकल चालवण्यावरच अधिक भर असल्याचेही सांगण्यात आले. पश्चिम रेल्वेने नऊ डबे विनावातानुकूलित आणि सहा डबे वातानुकूलित असलेल्या पंधरा डबा अर्धवातानुकूलित लोकलच्या चाचणीचाही प्रस्ताव तयार करून तो आरडीएसओकडे पाठवला आहे.

## पृष्ठ १ वरुन

### झारखंड निवडणूक निकाल

यांच्या लोक जनशक्ती पक्षानेही भाजपची साथ सोडली होती. त्यामुळं भाजपपुढं या निवडणुकीत मोठं आव्हान होतं.

***आदिवासी चेहराच नाही***

विधानसभा निवडणुकांमध्ये मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार घोषित करण्याची पद्धत भाजपनं सुरू केली. पण, या निवडणुकीत त्यांनी अशा कोणत्याही नेत्याला पुढं आणलं नाही. झारखंडमध्ये आदिवासी मतदान खूप निर्णायक आहे. गेल्या निवडणुकीनंतर मात्र, भाजपनं आदिवासी नसलेल्या रघुबर दास यांनी मुख्यमंत्रिपदावर विराजमान केलं होतं. याचा फटका भाजपला बसला. यावेळी तर भाजपनं दास यांचं नावही पुढं केलं नाही.

***सत्तेच्या विरोधात लाट***

झारखंडमध्ये सत्ता विरोधी लाट होती. राज्यात सरकारी नोकऱ्यांसाठी भरती करणाऱ्या सेवा आयोगाची अवस्था खूपच वाईट आहे. १७ ऑगस्ट २०१५ रोजी परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध झाली होती. पण, भरतीची प्रक्रिया २५ जानेवारी २०१९पर्यंतही पूर्ण झाली नव्हती. असे अनेक मुद्दे राज्य सरकारच्या विरोधात होते. त्यामुळं सरकाविषयी विरोधात मत तयार झालं होतं.

### शेतकरी कर्जमाफीसाठी ३० हजार कोटींची आवश्यकता

शेतकऱ्यांना १८ हजार ८९१ कोटींची कर्जमाफी दिली होती. त्यावेळी कर्जमाफीसाठी जाहीर झालेल्या रकमेतील ६ हजार कोटी अद्याप शिल्लक आहेत. पुढील वर्षात होणाऱ्या अर्थसंकल्पात २५ कोटींची तरतूद आणि मागील जमा सहा हजार कोटीं मिळून शेतकरी कर्जमाफी होण्याची शक्यता आहे.

### १ जानेवारीपासून ज्येष्ठांचे पास बंद!

दिशेने वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ प्रशासनाकडून साध्या पासऐवजी अत्याधुनिक स्मार्ट कार्ड दिले जात आहे. या कार्डवर बस पासधारकाचे नावासह बसचा प्रकार, प्रवासाची मुदत अशा सर्वच गोष्टी नमूद केल्या जात आहेत. हे कार्ड संबंधित सवलतधारकाच्या आधार क्रमांकाशी जोडले जात आहे. ५५ रुपये नाममात्र शुल्क घेऊन हे कार्ड दिले जात आहे.

जे ज्येष्ठ नागरिक आधार नोंदणी करून स्मार्ट कार्ड घेणार नाहीत, त्यांना १ जानेवारी २०२० पासून एस.टी.तून प्रवास करताना तिकिटाची सवलत मिळणार नाही. कोल्हापूर, संभाजीनगर, इचलकरंजी, गडहिंग्लज, गारगोटी, कुरूंदवाड, मलकापूर, चंदगड, राधानगरी, कागल, आजरा, गगनबावडा, मलकापूर येथील आगारामध्ये ज्येष्ठ नागरिक स्मार्ट कार्ड नोंदणी सुरू आहे.

# राज्यातील विद्यार्थी संख्येत १.५३ लाखांनी घट

**मुंबई-** गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रातील खासगी आणि सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे उघडकीस आले आहे. २०१४-१५ च्या तुलनेत २०१७-१८ या वर्षांत विद्यार्थी संख्येत तब्बल एक लाख ५३ हजार १५ ने घट झाली असून याबाबत शिक्षण तज्ज्ञही चिंतित आहेत. लोकसंख्यावाढीच्या जननदरातील घसरण त्याला कारणीभूत असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. लोकसंख्यावाढीच्या जननदरात २००७-०८ च्या तुलनेत २०१७ मध्ये घट झाल्याचे आढळले आहे. २००७-०८ मध्ये जननदर ३२.०७ टक्के होतो. तो २०१७ मध्ये २७.७८ टक्क्यांवर आला. यात सुमारे ४.२९ टक्क्यांनी घट झाली. त्याचा परिणाम खासगी आणि सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या



संख्येवर झाल्याचे एका अहवालातून उघडकीस आले आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची संख्या २०१४-१५ मध्ये एक कोटी ९८ लाख ३७ हजार ४७८ इतकी होती. २०१७-१८ मध्ये ती एक कोटी ९६ लाख ८४ हजार ४६४ इतकी झाली. २०१४-१५ च्या तुलनेत २०१७-१८ मध्ये विद्यार्थी संख्येत एक लाख ५३ हजार १५ ने घट झाल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येत ९ टक्क्यांनी घट झाल्याचा दावा पालिकेकडून करण्यात आला आहे. २०१४-१५ मध्ये पालिका शाळांमध्ये ३ लाख ९१ हजार ७७२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. २०१८-१९ मध्ये पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या २ लाख ७१ हजार २१८ इतकी झाली. सतत गैरहजर राहिल्यामुळे ५५ हजार ९८२ विद्यार्थ्यांना शाळेतून काढून टाकण्यात आल्याची माहिती पालिकेच्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.मुंबईमधील खासगीसह एकूण शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या २०११-१२ मध्ये १४ लाख ७१ हजार ८९० इतकी होती. त्यात २०१८-१९ मध्ये ४५.८६ टक्क्यांनी म्हणजे तब्बल सात लाख ९६ हजार ८१४ इतकी घट झाली आहे. खासगी शाळांच्या तुलनेत पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येत झालेली घट ही कमी असल्याचा दावा पालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.



# अजित पवार आमचे होणारे उपमुख्यमंत्री -संजय राऊत

**मुंबई-** अजित पवार हे आमचे होणारे उपमुख्यमंत्री आहेत असं वक्तव्य शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केलं आहे. एसीबीकडून अजित पवार यांना क्लीन चिट मिळाली त्याचा आनंदच आहे. ते आमचे होणारे उपमुख्यमंत्री आहेत असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. महाविकास आघाडी सरकारचा शपथविधी २८ नोव्हेंबर रोजी पार पडला. त्यावेळी उद्धव ठाकरे आणि इतर सहा मंत्र्यांनी शपथ घेतली होती. मात्र अजित पवार यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली नव्हती. अजित पवार यांना कोणतं पद दिलं जाणार? याच्या विविध चर्चा रंगल्या होत्या. त्या चर्चांना आता संजय राऊत यांनी उत्तर दिलं आहे. अजित पवार हे आमचे होणारे उपमुख्यमंत्री आहेत असं वक्तव्य संजय राऊत यांनी केलं आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपासोबत जात उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. तसंच त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती. मात्र त्यानंतर शरद पवार यांनी अजित पवार यांचं हे बंड अवघ्या तीन दिवसांमध्ये संपवलं.

## संपादकीय...

# आडमुठे सरकार, संभ्रमित विरोधक

सुधारित नागरिकत्व कायदा आताच लागू करण्याचे कोणतेही सयुक्तिक कारण राज्यकर्ते देऊ शकलेले नाहीत. बांगलादेश, अफगाणिस्तान किंवा पाकिस्तानातून हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे भारतात येत आहेत, अशी स्थिती नाही. मग हा कायदा आणण्याचे कारण काय होते, या प्रश्नाचे उत्तर राज्यकर्त्यांकडे नाही. त्यामुळे केवळ समाजात फूट पाडण्याच्या हेतूने हा कायदा केला आहे, असा निष्कर्ष कुणी काढला तर तो गैर कसा? देशाची अर्थव्यवस्था कमालीची अडचणीत असताना असे भावनिक मुद्दे उकरून काढण्यामागील हेतू स्वच्छ नाही हे स्पष्ट आहे. वर्तमान राज्यकर्त्यांच्या हातून प्रशासनावरील पकड सैल होऊ लागल्याची लक्षणे दिसत आहेत. त्यामुळेच मुस्लिमांना लक्ष्य करण्याचा हुकमी पत्ता राज्यकर्त्यांनी, म्हटले तर हुशारीने, पण धोकादायकपणे खेळला आहे. गुजरात प्रयोगाचे 'राष्ट्रीयीकरण' करण्याचा हा डाव आहे. त्यामुळेच मुस्लिम समुदाय असो किंवा विरोधी पक्ष असोत, त्यांना या डावपेचांना तोंड देताना अतिशय सावधगिरीनेच



रणनीती तयार करावी लागणार आहे. अर्थात विरोधी पक्षांच्या आघाडीवरही सगळा आनंदीआनंदच आहे. या मुद्यावर सर्वसामान्य लोक व विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलन सुरू केले आहे. ते भरकटण्यापूर्वी आवरले जाणे आवश्यक आहे. अन्यथा देशात जातीय वणवा पेटविण्याच्या संधीची वाट पाहणाऱ्या शक्तींचे फावणार आहे. विरोधी पक्षनेत्यांनी आपापले अहंकार बाजूला ठेवून या जनआक्रोशाला विधायक प्रतिसाद देऊन त्याला सुयोग्य वळण देण्याची ही वेळ आहे. विरोधी पक्षांच्या तालेवार नेत्यांनी भूमिका घेण्याची गरज आहे. कुंपणावर बसणाऱ्यांना इतिहास क्षमा करणार नाही. हा जनक्षोभ तीव्र आहे आणि त्यासाठी लोकशाहीवादी व उदारमतवादी राजकीय शक्तींची व्यापक आघाडी निर्माण झाल्यास भरकटलेल्या जनतेला योग्य दिशा मिळू शकेल. या विधेयकाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसतर्फे दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर 'भारत बचाव रॅली' झाली. या मेळाव्यात तरुणांची उपस्थिती लक्षणीय होती. गर्दीदेखील होती आणि ती प्रतिसाद देणारी होती, हे वैशिष्ट्य मुद्दाम नमूद करावे लागेल. थोडक्यात वर्तमान राजवटीबद्दल नाराज असणारे लोक मोठ्या संख्येने जमले होते. या सभेत राहुल गांधी यांचे भाषण झाले. पण 'मी राहुल सावरकर नाही, राहुल गांधी आहे. माफी मागणार नाही' असे तडाखेबंद वाक्य बोलून त्यांनी माध्यमांना एक सनसनाटी हेडलाईन मिळवून दिली. 'भारत बचाव' मेळाव्याशी या वाक्याचा काहीही संबंध



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

नव्हता. नागरिकत्व दुरुस्ती कायदा, 'एनआरसी', गंभीर आर्थिक स्थिती, महागाई, लोकशाही संस्थांचा ऱ्हास अशा प्रमुख मुद्यांसाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे राहुल गांधी यांनी या मुद्यांवर बोलतानाच पुढील काळातील आंदोलनाची दिशा स्पष्ट करणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात काहीतरी चटकदार 'डायलॉगबाजी' करून त्यांनी मेळाव्याचा उद्देश व सूरच बदलून टाकला. बलात्काराबाबत त्यांनी केलेल्या टिप्पणीबद्दल भाजपने त्यांच्याकडे माफीची मागणी केली होती. मेळाव्याचा तो विषय नव्हता, पण काहीतरी खरमरीत बोलण्याच्या नादात त्यांनी चूक केली. 'भारत बचाव' राहिला दूर, सर्व माध्यमांनी 'राहुल सावरकर'वरच लक्ष केंद्रित केले. जे भाजपला हवे होते, ते राहुल गांधी यांनी केले. मूळ गंभीर मुद्दे राहिले बाजूला आणि वेगळ्याच मुद्याला त्यांनी हवा दिली. 'हम (कभी) नहीं सुधरेंगे' ही खूणगाठ मनाशी बांधूनच ते आले असावेत. त्यांनी सुवर्णसंधी वाया घालवली. या मेळाव्यानंतर सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांचे शिष्टमंडळ राष्ट्रपतींना भेटले. ते कर्मकांडही पार पडले. पुढे काय ? पुढील कार्यक्रमांबाबत सर्व विरोधी पक्षांमध्ये अनिश्चितता, गोंधळ कायम आहे. जगभरात जेथे जेथे विद्यार्थी आंदोलने झाली, तेथे त्यांनी विराट स्वरूप धारण करून प्रस्थापित राजसत्तेत परिवर्तन केल्याचे अनेक दाखले मिळतात. जयप्रकाश नारायण यांनी विद्यार्थी आंदोलनातूनच आणीबाणीच्या विरोधातले विराट आंदोलन सुरू केले होते. सध्याच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनालाही नेतृत्वाची गरज आहे. तूर्तास ते स्वयंस्फूर्त असले, तरी आगामी काळात हा असंतोष उचित दिशेने आणि मार्गाने प्रवाहित करण्यासाठी तेवढ्याच परिपक्व नेतृत्वाची आवश्यकता भासणार आहे. राहुल गांधी यांनी परिपक्वता न दाखविण्याचा 'निर्धार' केला असल्याने त्यांना कितपत विचारात घ्यायचे हा प्रश्नच आहे. नागरिकत्व कायदा आणि 'एनआरसी' (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स) या दोन मुद्यांवर जनतेत भरपूर मानसिक गोंधळ आहे.

# नवे निश्चलनीकरण

**''भारत सरकारने आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत तर काही ना काही निमित्ताने पुढील वर्षभरात तरुण रस्त्यावर येतील आणि हाँगकाँगसारखी परिस्थिती उद्भवेल. ठिणगी कशानेही पडेल, पण तीमागील कारण आर्थिक असेल,'' असे भाकीत आंतरराष्ट्रीय पटलावर काम केलेल्या एका तज्ज्ञाने अनौपचारिक चर्चेत अलीकडे वर्तवले. अवघ्या चार आठवड्यांतच त्याचा प्रत्यय येताना दिसतो. नागरिकत्व सुधारणा कायदा आणि त्या पाठोपाठ येणार असे सत्ताधारीच जिच्याबद्दल जाहीर सभांतून सांगतात ती नागरिकत्व नोंदणी यांच्या विरोधातील उद्रेक ही त्याचीच प्रचीती. दिल्ली, लखनौ, अहमदाबाद, बेंगळूरु, हैदराबाद, मुंबई आदी शहरांत या मुद्द्यांवर जो प्रचंड जनक्षोभ उसळून आला त्यातून अनेक व्यापक अर्थ निघतात. बहुसंख्य त्याबाबत अनभिज्ञ आहेत.**




हे दोन्ही कार्यक्रम जसेच्या तसे अमलात आले तर देशातील प्रत्येक नागरिकास आपले नागरिकत्व सिद्ध करावे लागेल. हिंदू असो वा अन्य कोणी. या मुद्द्यावर इतका माहितीचा अंधार आहे की अजूनही हे सव्यापसव्य आपल्या सर्वांना करावे लागेल याची जाणीव सोडाच, पण माहितीही अनेकांना नाही. हे करायचे म्हणजे देशातील १३० कोटी वा अधिक नागरिकांनी प्रत्येकाने आपण भारतीय नागरिक आहोत याचे पुरावे द्यायचे. तेदेखील एका प्रस्तावाप्रमाणे १९५० च्या आधीचे असायला हवेत. त्यासाठी 'आधार' आणि मतदान ओळखपत्रे (कारण मतपेट्यांच्या राजकारणासाठी ती मुक्तपणे आणि बनावट दिली असण्याची शक्यता) ही पुरावा म्हणून चालणार नाहीत. आता यावर, 'प्रत्येकाकडे काही ना काही किमान कागदपत्रे असतातच', असे काही जण म्हणतील. तो शहाजोगपणा झाला. पण वास्तव नाही. ते देशातील लाखो गरीब, पददलित, भटके विमुक्त जाती/जमातींना पडलेल्या प्रश्नात आहे. हा वर्ग विशेषत्वाने नमूद करावयाचा कारण जेव्हा अशा प्रकारचे आडमुठे निर्णय सरकार घेते तेव्हा पहिला बळी याच वर्गाचा जातो. तेव्हा सर्वच जणांकडे आवश्यक ती कागदपत्रे असतील, हे मानणे हा राजकीय आणि सामाजिक आंधळेपणा. दुसरे असे की अशी काही कागदपत्रे नसल्यास ती मिळवण्याची व्यवस्था आणि सोय श्रीमंतांना असेल. ती 'मागच्या दाराने' मिळवता येतील. पण त्यासाठीही 'खर्च' करण्याची ज्याची ऐपत नाही, त्यांनी काय करावे?

आणि असे काही पुरावे नसलेले सगळेच्या सगळे मुसलमानच असतील असे नाही. त्यार्त हदूच असण्याची शक्यता अधिक. आसामातील नागरिक पडताळणी यादीत हेच झाले. या बाबतच्या छाननीतून १९ लाख जण भारतीय नागरिक नसल्याचे आढळले तरी भाजप सरकार ती यादी मानावयास तयार नाही. कारण त्यात प्राधान्यानें हदूच आहेत म्हणून. हे एका राज्याचे झाले. हा रिकामटेकडा उद्योग संपूर्ण देशभरात होईल तेव्हा काय होऊ शकेल, याचा विचारदेखील शहाण्याच्या अंगावर काटा आणण्यास पुरेसा ठरेल. तो केल्यास सध्याच्या निदर्शनांसि हदूंचा मिळणारा पाठिबा अनाठायी नाही, हे लक्षात यावे. यावर सत्ताधारी पक्षाचे उत्तर, ''आमच्या निवडणूक कार्यक्रमात याचा उल्लेख होता आणि ज्या अर्थी आम्ही निवडून आलो त्या अर्थी लोकांना हा कार्यक्रम मान्य आहे,'' असे असेल. ते राजकीय चातुर्याच्या निकषावर उतरेल.

पण याच चातुर्याने त्याचा प्रतिवादही करता येईल. तो असा की या देशातील ६५ टक्के जनतेने या 'नागरिकत्व कार्यक्रमास' पाठिबा दिलेला नाही. असा ठाम निष्कर्ष काढता येतो याचे कारण आजमितीस देशातील तब्बल १६ राज्यांत बिगर-भाजप पक्ष सत्तेवर आहेत. या राज्यांमधील जनतेचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण ६५ टक्के इतके असल्याने या निर्णयास बहुमताचा विरोध आहे, असे म्हटल्यास ते कसे काय नाकारणार? हा मुद्दा आणखी एका कारणासाठी महत्त्वाचा.

ते म्हणजे या राज्यांचा सदर कायद्यांस असलेला विरोध. यातील काहींनी, उदाहरणार्थ ममता बॅनर्जी वा पंजाबचे मुख्यमंत्री अमिरदर सिंग यांनी, आपापल्या राज्यात हा कायदा आपण राबवणार नाही, असे जाहीर केले आहे. यावर केंद्र काय करणार? कारण ही नागरिक नोंदणी प्रक्रिया समजा अमलात आणायची जरी म्हटले तरी ते राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या सहभागाशिवाय केवळ अशक्य. एकट्या आसामात या प्रक्रियेसाठी तेथील सरकार तीन वर्षे काम करत होते. म्हणजेच राज्यांच्या सहभागाखेरीज हे काम करताच येणार नाही. यावर गृहमंत्री अमित शहा काय करणार? ते एक करू शकतात. घटनेच्या ३५६ कलमाचा वापर करून असे 'बंडखोर आणि देशद्रोही' सरकार बरखास्त करणे. म्हणजे मग सहा महिन्यांत निवडणुका. आणि समजा या निवडणुकांतही विरोधी पक्षास बहुमत मिळाल्यास काय करणार? की पुन्हा सरकार बरखास्ती?

याच बरोबर देशाची घटना हादेखील दुर्लक्ष करावा असा मुद्दा नाही. घटनेच्या सर्व अनुच्छेदांत भारतीयांना देण्यात आलेल्या प्रत्येक अधिकारासंदर्भात 'देशाचे नागरिक' असा उल्लेख आहे. अपवाद फक्त दोनच. अनुच्छेद १४ आणि अनुच्छेद २१. हे दोन्ही मूलभूत हक्क या स्वरूपाचे आहेत. कायदा आणि कायद्यानुसार होणारी प्रक्रिया यांत समानतेच्या तत्त्वाची हमी देणाऱ्या या अनुच्छेदांत मात्र घटना 'नागरिक' असा उल्लेख न करता 'व्यक्ती' असे नमूद करते. याचा अर्थ असा की आचार/ विचार/ धर्माचार आदींतील मूलभूत स्वातंत्र्य या भूमीतील प्रत्येकास देण्यास घटना बांधील आहे. सरकारच्या कृतीस सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले आहेच. तेथे ही बाब समोर तरी येईलच.

पण तोपर्यंत राजकीय परिणाम हाच एक मुद्दा सरकारला कळत असेल तर त्याबाबतही लक्षात घ्यावे असे बरेच काही झाले. पश्चिम बंगाल राज्यातील विधानसभा पोटनिवडणुका ही त्यातील एक बाब. या निवडणुका आसामातील नागरिकत्व पडताळणी पूर्ण झाल्यावर आणि नागरिकत्व दुरुस्ती विधेयकाची घोषणा होता होता घडल्या आणि या निवडणुकांत नागरिकत्व हा मुद्दा करण्याचा प्रयत्न भाजपने केला. तथापि त्या राज्यातील तीनही मतदारसंघांत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूलचे उमेदवार विजयी झाले. धक्का फक्त इतकाच नाही. तर मतदानाची टक्केवारी हादेखील भाजपसाठी चिंतेचा विषय ठरावा. या तीनही मतदारसंघांतून भाजपची मते घटली. त्यातील कालियागंज मतदारसंघात तर भाजपची साठ हजारांहून अधिक मते तृणमूलकडे गेली. त्यापूर्वी जम्मू-काश्मीरचा अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतरच्या पहिल्या विधानसभा निवडणुकांत हरियाणा राज्यात भाजपला धापा टाकाव्या लागतात, महाराष्ट्रात मताधिक्य घटते आणि नागरिकत्वाचा वादग्रस्त मुद्दा चर्चेत आल्यानंतर पश्चिम बंगालात भाजपचे मताधिक्य कमी होते, या दोन्ही घटना पुरेशा सूचक ठरतात.

पण असा कोणताही साधकबाधक विचार करण्याच्या मन:स्थितीत केंद्र सरकार दिसत नाही. अशी अवस्था या सरकारबाबत वारंवार येते याचे कारण 'आधी कृती आणि मग (गरज पडल्यासच) विचार' अशी या सरकारची कार्यशैली. काही अजागळ त्यास धडाडी असे संबोधतात.

# कल्याणच्या मेट्रो मार्गात बेकायदा बांधकामे



कल्याणमधील मेट्रो मार्गात कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या नगररचना विभागाने इमारत बांधकाम परवानग्या दिल्या आहेत. त्या पूर्णपणे नियमब आणि मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाने पालिकेला तीन वर्षांपूर्वी पाठविलेल्या पूर्वसूचना पत्राच्या अवमूल्यन करणाऱ्या आहेत. या परवानग्या देणाऱ्या नगररचना विभागातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करा. सुरू असलेली बांधकामे तातडीने थांबवा आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसांत प्राधिकरणाला पाठवा, असे आदेश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) महानगर आयुक्त आर. ए. राजीव यांनी पालिका आयुक्त गोविंद बोडके यांना दिले आहेत.

दोन महिन्यांपूर्वी कल्याणमधील मेट्रो मार्गात 'एमएमआरडीए'ने काही सुधारणा केल्या आहेत. तो आराखडा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्या सुधारित प्रभाव क्षेत्रातील आराखड्यानुसार सुधारित इमारत बांधकाम परवानग्या नगररचना विभागाने दिल्या असतील तर त्या तातडीने थांबविण्यात याव्यात, असेही राजीव यांनी पालिकेला कळविले आहे. आयुक्त राजीव यांच्या पत्रामुळे नगररचना विभागातील बांधकामांना परवानगी देणारे अधिकारी, मेट्रो मार्गिकेत जोमाने गगनचुंबी इमारती उभे करणारे १२ विकासक हादरले आहेत.



कल्याणमधील मेट्रो मार्गिकेत नगररचना अधिकाऱ्यांनी इमारत बांधकाम परवानग्या देऊन या मार्गात अडथळे उभे करण्यास सुरुवात केली असल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने दिले होते. प्रस्तावित मेट्रो मार्गात पालिकेने नियमबह्य बांधकाम परवानग्या दिल्याच्या तक्रारी माहिती कार्यकर्ते मनोज कुलकर्णी, कौस्तुभ गोखले यांनी 'एमएमआरडीए'कडे केल्या आहेत. तक्रारी करूनही मार्गिकेतील बांधकामे थांबविली जात नाही म्हणून कुलकर्णी यांनी पंतप्रधान कार्यालयाकडे या प्रकरणाची तक्रार केली. हे प्रकरण अंगलट येण्याची शक्यता गृहीत धरून दोन महिन्यांपूर्वी आयुक्त गोविंद बोडके यांनी नगररचना विभागातील मेट्रो मार्गात बांधकाम परवानग्या देणाऱ्या नऊ अभियंत्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. ठाणे ते भिवंडी मेट्रो मार्गिका, तेथील स्थानके निश्चितीचे काम पूर्ण झाले की प्राधिकरणाचे अधिकारी भिवंडी-कल्याण मेट्रो मार्गाचे काम हाती घेणार आहेत. हे काम सुरू होण्यापूर्वीच आपण सुरू केलेली बांधकामे पूर्ण करू असा विचार करून कल्याणमधील १२ विकासकांनी मेट्रो मार्गातील बांधकामे धडाधड पूर्ण करण्याचा सपाटा लावला आहे. साहाय्यक संचालक नगररचना मारुती राठोड यांनी या सर्व बांधकामांना कामे थांबविण्याच्या नोटिसा देऊनही विकासक नगररचना अधिकाऱ्यांना दाद देत नाहीत. या विकासकांनी आम्ही आमच्या जोखमीवर ही कामे करीत आहोत. आम्ही प्राधिकरणाकडून 'एनओसी' आणू, असे लेखी लिहून दिले आहे. त्यामुळे आम्ही यासंदर्भात काही करू शकत नाही, असे नगररचना अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, कल्याणमधील मेट्रो मार्गिकेच्या बाधित क्षेत्रात एकही बांधकाम दिसता कामा नये. असे काही घडले असेल तर परवानग्या देणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करा आणि १५ दिवसांत कार्यवाही अहवाल एमएमआरडीएला पाठवा, असे पत्र आयुक्त राजीव यांनी पालिकेला पाठवले आहे.

***प्राधिकरणाच्या सूचनेकडे दुर्लक्ष***

कल्याणमध्ये दुर्गाडी किल्ला, सहजानंद चौक, शिवाजी चौक ते बाजार समिती असा मेट्रो मार्ग प्रस्तावित आहे. या मार्गात मेट्रोची स्थानके, सरकता जिना, उद्वाहन या कामांसाठी प्राधिकरणाने जागा निश्चित केली आहे. या मार्गिकेत बांधकाम परवानग्या देऊ नयेत असे प्राधिकरणाने २०१६ मध्ये पालिकेला कळवूनही नगररचना अधिकाऱ्यांनी १२ गगनचुंबी संकुलांना परवानग्या दिल्या आहेत.

# दिव्याला लवकरच स्वतंत्र पोलीस ठाणे

**ठाणे :** ठाणे शहरातील पोलीस ठाण्यांची संख्या वाढवण्यासाठी प्रशासनाने वेगाने हालचाली सुरू केल्या असून दिवा शहरासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्याचा प्रस्ताव ठाणे पोलिसांकडून गृह खात्याला पाठवण्यात आला आहे. सद्य:स्थितीत मुंब्रा पोलीस ठाण्यातून दिव्याचा कारभार हाकला जात आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे ठाणे जिल्ह्यातील गुन्ह्यांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यातील शहरी भागात वाढणाऱ्या गुन्हेगारीला आवर घालण्यासाठी ठाणे शहर पोलिसांनी उपाययोजना सुरू केल्याचे पाहायला मिळत आहे. जिल्ह्यातील शहर पोलिसांचे ठाणे, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर आणि बदलापूर भागांत सध्या एकूण ३५ पोलीस ठाणी आहेत. त्यापैकी मुंब्रा पोलीस ठाण्याची हद्द मुंब्रा, कौसा, दिवा, आगासन, खार्डी, साबे आणि बेतावडे या भागापर्यंत आहे. या भागांमधील लोकसंख्या दोन लाखांहून अधिक आहे. तसेच मुंब्रा शहर हे संवेदनशील मानले जात असून तेथे दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या भागातील वाढता ताण लक्षात घेता ठाणे शहर पोलिसांनी



मुंब्रा पोलीस ठाण्याच्या विभागणीचा निर्णय घेतला असून त्यापैकी दिवा, आगासन, खार्डी, बेतावडे आणि साबे गावांसाठी स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्यात येणार आहे. त्यासाठी आगासन येथे भूखंड आरक्षित असून त्या ठिकाणी दिवा पोलीस ठाणे उभारण्यात येणार आहे.

**पोलीस चौकीवर अधिक भार**

सध्या दिवा परिसरात मुंब्रा पोलीस ठाणेअंतर्गत पोलीस चौकी आहे. तसेच ठाणे पोलिसांच्या विशेष शाखेचे कार्यालयही आहे. दिवा पोलीस चौकीत दोन साहाय्यक पोलीस निरीक्षक आणि एक पोलीस उपनिरीक्षक कार्यरत आहेत. दिवा आणि लगतच्या परिसरात दरवर्षी २०० हून अधिक गुन्ह्यांची नोंद होते. या गुन्ह्यांची नोंद करण्यासाठी मुंब्रा पोलीस ठाणे गाठावे लागते. त्याचबरोबर दिवा चौकीत नेमणूक करण्यात आलेला अधिकारी आणि कर्मचारीवर्ग परिसराचे नियंत्रण करण्यासाठी अपुरा पडत असल्याचे दिसून आले.

# पोलीस आयुक्तालयाची घोषणा फक्त कागदावरच?

## *भाजप सरकारची घोषणा हवेत*

## *महाविकास आघाडी सरकारच्या निर्णयाकडे साऱ्यांचे लक्ष*

नालासोपारा : सहा वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या पालघर जिल्ह्यामधील वसई तालुक्यात मागील काही वर्षांपासून गुन्हेगारीमध्ये लक्षणीय वाढ झाली असून गुन्हेगारांवर कायद्याचा धाक नसल्याचे चित्र दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या ऑगस्ट महिन्यात भाजपच्या नेतृत्वाखालील युती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आयुक्तालयाच्या स्थापनेची घोषणा केली होती. मात्र निवडणुका झाल्यानंतर भाजपचे सरकार सत्तेवर न आल्याने ही घोषणा हवेत विरण्याची शक्यता आहे. दरम्यान, नवीन महाविकास आघाडी सरकार याबाबत काय निर्णय घेते, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

वसई परिसरातील गुन्हेगारीवर अंकुश लावण्यासाठी एक अप्पर पोलीस अधीक्षक आणि तीन उपविभागीय पोलीस अधिकारी देण्यात आले आहेत. मात्र वसई तालुक्यातील सातही पोलीस ठाण्यात तक्र ार




घेऊन गेलेल्या लोकांना न्यायासाठी किंवा गुन्हा दाखल करण्यासाठी अनेक वेळा पोलीस ठाण्याच्या चकरा माराव्या लागतात. त्यामुळे लोकांचा पोलिसांवरच विश्वास उडाला आहे. नालासोपारा शहरातील टाकी रोड, संतोष भवन, धानिवबाग, गाला नगर या पट्ट्यातील झोपडपट्टीमध्ये युपी, बिहारवरून आलेले अनेक तडिपार आणि गुन्हेगारी स्वरूपाचे लोक राहत असल्याची चर्चा आहे. पण त्यांची कोणतीही माहिती पोलिसांकडे नाही. विरारमध्ये वाळू माफियांनी हैदोस घातला होता. अनेक तक्र ारी येत होत्या, पण पोलीस काही त्याकडे लक्ष देत नसल्यामुळे शेवटी पोलीस अधीक्षक गौरव सिंग यांना मैदानात उतरावे लागले आणि त्यांनी अडीच कोटींचा मुद्देमाल पकडला होता.

वसई-विरार शहर आणि मिरा-भाईंदर शहरासाठी २६ पोलीस ठाण्यांचे स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याच्या हालचालींना यंदाच्या ऑगस्ट महिन्याआधी जोर वाढला होता. १५ ऑगस्ट रोजी या आयुक्तालयाची अधिकृत घोषणादेखील शासनस्तरावरून करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात आयुक्तालयाच्या उभारणीला सुरुवात झालेली नाही. वसई-विरार शहराची वाढलेली गुन्हेगारी लक्षात घेता सध्या या परिसराला स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची नितांत गरज आहे. एकदा आयुक्तालयाची स्थापना झाल्यास पालघर पोलीस अधीक्षकांच्या कार्यकक्षेतून वसई-विरार परिसर विभक्त होऊन तो वसई-विरार, मिरा-भाईंदर शहर पोलीस आयुक्तालयाशी जोडण्यात येईल.

# वसईतील गृह घोटाळ्यावर कारवाई होणार कधी?

**नालासोपारा :** वसईच्या पूर्वेकडील गोखिवरे गावाजवळील फादरवाडी परिसरात औद्योगिक वापरासाठी आरक्षित जमिनीवर रहिवासी संकुल उभारुन सदनिकाधारकांची फसवणूक करून वसईत मोठा गृहघोटाळा उघडकीस झाल्याची बातमी 'लोकमत'च्या ६ डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाली होती. महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने रीतसर पत्रव्यवहार करून या बांधकामावर कारवाई करण्याचे आदेश 'जी' प्रभागाच्या सहाय्यक आयुक्तांना दिले होते. पण या आदेशाला हरताळ फासत कारवाईसाठी त्यांना मुहूर्तच सापडत नाही. दरम्यान, या घोटाळ्याचा प्रश्न नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात उपस्थित करणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळते आहे. तसेच तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत चौकशी करून तत्काळ कारवाई करण्यासाठी वसई-विरार महापालिकेला सांगितले असल्याची माहितीही समोर येत आहे.

या इमारती बांधून सामान्य नागरिकांची फसवणूक करणाऱ्या शांती होम्स रियल्टी या बांधकाम विकासकावर सहाय्यक आयुक्तांच्या तक्र ारीवरुन वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसई पूर्वेकडील फादरवाडी परिसरात शांती होम रिॲल्टीने गाव मौजे गोखिवरे, सव्हे क्र . २२६, २२७ हिस्सा क्र .२, ३, ४, ५ व सव्हे क्र . २२८ मध्ये एक रहिवासी संकुल उभारले आहे. वसई- १ येथील महाराष्ट्र शासन नोंदणी व मुद्रांक विभागातून कागदपत्रे काढली असता त्यात या इमारतीतील युनिट (गाळे) हे सदनिका क्र मांक असे लिहून विकले गेले आहेत. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार गंभीर असतानाही नगररचना विभागातील अभियंत्यांनी बिल्डिंगला ओसी दिली. विशेष म्हणजे या इमारतीला पालिकेने फायर सर्टिफिकेट, घरपट्ट्या व नळजोडण्या देखील दिल्या आहेत.

# पालिका कर्मचाऱ्यावर फेरीवाल्याचा चाकूहल्ला

फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या पालिका कर्मचाऱ्यावर फेरीवाल्याने चाकूहल्ला केल्याची घटना घडली. या घटनेत कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी तुळिंज पोलीस स्थानकात गुन्हा दाखल झाला आहे.



काही दिवसांपासून रस्त्यांच्या दुतर्फा बसलेल्या बेकायदा फेरीवाल्यांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या होती. त्यामुळे अशा फेरीवाल्यांवर कारवाई सुरू आहे. पालिका प्रशासनावर वाढता दबाव पाहता आज वसई-विरार शहर महानगरपालिकेचे अतिक्रमण अधिकारी गोकुळ पाटील कर्मचाऱ्यांसह गाला नगरच्या राज नगर परिसरात गेले होते. यावेळी फेरीवाल्यांवर कारवाई करताना एका हातगाडीवाल्याशी हातापायी झाली. त्यावेळी एका महिला फेरीवाली व तिच्या इतर साथीदारांकडून चाकूहल्ला करण्यात आला. तसेच इतर कर्मचाऱ्यांनाही मारहाण करण्यात आली. दरम्यान, पालिका व फेरीवाल्यांमध्ये झालेल्या झटापटीत जखमी कर्मचाऱ्यांना उपचारासाठी जवळच्या स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# देशभर जनक्षोभ: पोलिसांची धरपकड सुरूच!

**नवी दिल्ली-** 'नागरिकत्व' कायद्याविरोधात ईशान्येमध्ये पेटलेल्या आंदोलनाच्या वणव्याने आज देशातील बारा राज्यांना आपल्या कवेत घेतले. पोलिसांनी कडक भूमिका घेत देशभरात दीड हजाराहून अधिक आंदोलकांना ताब्यात घेतले. देशभरातील या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गृहमंत्री



अमित शहा यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बड्या अधिकाऱ्यांची बैठक बोलाविली होती. या आंदोलनामुळे सरकार काहीशी नमती भूमिका घेण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय कायदामंत्री रविशंकर प्रसाद यांनी आज केंद्र सरकार विद्यार्थ्यांशी चर्चा करेल; पण तुकडे तुकडे गँगशी नाही, अशा प्रकारचे वक्तव्य केले, तर मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनी विद्यापीठांना राजकारणापासून दूर ठेवावे, असे मत मांडले. दिल्लीत आज काही भागांमधील मेट्रोसेवा, तसेच इंटरनेट सेवा थांबविण्याची वेळ आली.

सामाजिक संघटनांची निदर्शने रोखण्यासाठी लालकिल्ला परिसरात जमावबंदीचा आदेशही लागू करण्यात आला होता. हा आदेश झुगारून निदर्शने करणाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. उत्तर आणि मध्य दिल्लीतील वॉल सिटी भाग, मंडी हाउस परिसर, हिंसाचाराची झळ बसलेला सीलमपूर, जामियानगर आणि शाहीनबाग परिसर, तसेच बवाना या भागांमधील एसएमएस, कॉलिंग आणि इंटरनेट सेवा सकाळी नऊ ते दुपारी एकपर्यंत थांबविण्यात आल्या होत्या.

दरम्यान, आंदोलकांना जमा होता येऊ नये यासाठी जनपथ, जामा मशीद, लालकिल्ला, विद्यापीठ, दिल्ली गेट, बाराखंबा रोड, पटेल चौक, लोककल्याण मार्ग, उद्योग भवन, आयटीओ, प्रगती मैदान, खान मार्केट, मंडी हाउस, सर्वाधिक वर्दळीचे केंद्र असलेले राजीव चौक मेट्रो स्थानक आदी १९ मेट्रो स्थानके बंद करण्यात आली होती. यातील काही नंतर सुरूही करण्यात आली. नागरिकत्व कायद्याविरोधात केरळ, तमिळनाडू आणि कर्नाटकमध्येही आंदोलन झाले. कर्नाटकात हुब्बाली, कलबुर्गी, हसन, म्हैसूर आणि बळ्ळारीत तीव्र आंदोलन झाले. बंगळूरमधील टाउन हॉल परिसरात आंदोलन करणारे ज्येष्ठ इतिहास संशोधक रामचंद्र गुहा आणि दिल्लीत सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याने बुद्धिवंतांच्या वर्तुळातून याचा निषेध होऊ लागला आहे.



# पुण्यात मेट्रो जूनमध्ये धावणार

**पुणे- वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गावरील आनंदनगर (आयडीएल कॉलनी) ते गरवारे महाविद्यालय आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) ते येरवडा या टप्प्यांतील प्रत्येकी पाच किलोमीटरचे काम पुढील सहा महिन्यांत पूर्ण होईल. या टप्प्यांवरील प्रवाशांना येत्या जूनपासून मेट्रोतून प्रवास करता येईल, अशी माहिती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी शुक्रवारी दिली.**

याआधी शहरात मेट्रो डिसेंबरमध्ये धावेल, असा दावा करण्यात आला होता. शहरातील विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा आढावा महापौरांसह महापालिकेतील सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी घेतला. उपमहापौर सरस्वती शेंडगे, स्थायी समितीचे अध्यक्ष हेमंत रासने, सभागृहनेते धीरज घाटे, आयुक्त सौरभ राव यांच्यासह विभागप्रमुख या वेळी उपस्थित होते. त्या वेळी वनाझ ते रामवाडी मेट्रो मार्गाच्या कामाची माहिती महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्याचा आधार घेत महापौरांनी मेट्रो प्रवासाचा मुहूर्त जाहीर केला.

महापौर म्हणाले, ''पिंपरी-स्वारगेट या मेट्रो मार्गावरील शिवाजीनगर ते स्वारगेट भुयारी मार्गाच्या कामाला सुरुवात झाली आहे. सध्या रोज १२ मीटर लांबीचे काम पूर्ण होत आहे. त्याशिवाय नागरिकांच्या मागणीनुसार ८० ते ८५ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गाचा प्रकल्प आराखडा महामेट्रो तयार करीत आहे. वनाझ ते नियोजित शिवसृष्टीपर्यंत मेट्रो नेली जाणार आहे आणि शिवसृष्टीही लवकरच मार्गी लागेल. याचबरोबर 'पीएमपी'च्या बसगाड्या वाढविण्यात येणार आहेत.'' नदीसुधार (जायका) आणि शहरांतर्गत उच्च क्षमता वर्तुळाकार मार्ग (एचसीएमटीआर) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी वेगाने कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत; तसेच तळजाई ते सिंहगड रस्ता आणि कोथरूड ते पाषाणपर्यंतच्या बोगद्याच्या कामांना चालना देण्यात येत आहे. वैद्यकीय महाविद्यालयाबाबतच्या राज्य सरकारच्या आक्षेपवरही महापालिका लवकरच खुलासा करणार आहे. महापालिकेत सत्ता आल्यानंतर जाहीर केलेली सर्व कामे पूर्ण होत नसली, तरी बहुतांशी कामे प्रगतिपथावर आहेत, असे महापौर मोहोळ यांनी सांगितले.

# मुंबईकरांसाठी संध्याकाळची वेळ रस्ते अपघाताची

**मुंबई-** मुंबईत सायंकाळी ६ ते ९ या वेळेत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहनांची गर्दी असते. त्यामुळे वाहतूक मंदावते. पण याच वेळेत सर्वात जास्त ३८६ रस्ते अपघात घडले असून रात्री ९ ते १२ दरम्यान सर्वाधिक ७१ मृत्यू झाल्याचे महामार्ग पोलिसांच्या २०१८ च्या आकडेवारीतून समोर आले आहे. आकडेवारीनुसार, मुंबईतील महामार्गांवर २०१८ मध्ये २,३५० अपघात झाले. त्यामध्ये ४७५ जणांचा मृत्यू झाला. यापैकी ६ ते ९ या वेळेत ३८६ अपघात झाले असून यात ६३ जणांना नाहक जीवाला मुकावे लागले आहे. तर रात्री ९ ते १२ या वेळेत ३४० अपघात घडले असून, त्यामध्ये ७१ जणांचा मृत्यू झाला आहे.

याच कालावधीत सकाळी ६ ते ९ दरम्यान १९९ रस्ते अपघात झाले असून ५४ जणांनी जीव गमावला. तर सकाळी ९ ते दुपारी १२ दरम्यान २९६ अपघातांत ६१ जणांचा मृत्यू झाला. दुपारी वाहतूक कमी असते; पण त्या वेळेतही मोठ्या प्रमाणात अपघात घडत असल्याचे महामार्ग पोलिसांच्या आकडेवारीनुसार समोर आले आहे. दुपारी १२ ते ३ या वेळेत ३१२ रस्ते अपघात होऊन ६४ जण ठार झाले. तर दुपारी ३ ते संध्याकाळी ६ दरम्यान ३५८ अपघात होऊन ५४ जणांना मृत्यू झाला. रात्री १२ ते ३ या वेळेत २८१ अपघातांत ६४ आणि दुपारी ३ ते संध्याकाळी ६ या वेळेत १७८ अपघातांत ४४ जणांचा मृत्यू झाला. २०१८ मध्ये रात्री ९ ते १२



दरम्यान सर्वाधिक ७१ मृत्यू मुंबईतील रस्त्यांवर झाले. या कालावधीत घडलेल्या एकूण २,३५० अपघातांमध्ये ४७५ जणांचा मृत्यू झाला. त्यात ११२ पुरुषा तर २५ स्त्रिया होत्या. यात १९ ते २५ वयोगटांतील सर्वाधिक १३७ तरुण, तरुणी होते. तर, १८ वर्षांखालील वयोगटात कमी अपघात घडले आहेत.

# बँक अधिकाऱ्यांना बनावट नोटांची धास्ती; करावी लागते स्वतःच्या खिशातून भरपाई

**औरंगाबाद-** बँकेत दररोज बनावट नोटा येत आहेत. मात्र, कॅशिअरची दक्षता व अद्ययावत उपकरणामुळे बंडलमध्ये येणारी बनावट नोट लगेच शोधली जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहरात आजघडीला सुमारे ५० कोटी रुपये किमतीच्या बनावट नोटा व्यवहारात फिरत



आहेत. या नोटा फिरून शेवटी बँकेत जमा होण्यासाठी येतात. नजरचुकीने एखादी नोट जमा झाली तर तेवढी रक्कम अधिकाऱ्यांना स्वत:च्या पगारातून द्यावी लागते. यामुळे बनावट नोटांविषयी बँक अधिकाऱ्यांमध्ये कमालीची धास्ती आहे. राष्ट्रीयीकृत बँका असो वा खाजगी बँक, तसेच पतसंस्था येथील कॅशियर व अन्य अधिकाऱ्यांना नोटा हाताळताना सदैव सावध राहावे लागत आहे. विशेषत: १००, ५०० व २ हजार रुपयांचे बंडल जेव्हा येते तेव्हा त्याची तीन ते चार वेळेस तपासणी करावी लागत आहे. बनावट नोटा शोधणाऱ्या उपकरणातून एक नोट दोनदा तपासून खात्री करून मगच जमा करून घ्यावी लागत आहे. बँकेतील एका अधिकाऱ्याने सांगितले की, बँकेच्या एका शाखेत महिन्यातून २० ते ३० बनावट नोटा येतात. मात्र, ग्राहकांना सांगून त्या नष्ट केल्या जातात किंवा पोलिसांत तक्रार दिली जाते. बँका शक्यतो ग्राहकांचा राग ओढवून घेत नाही; पण एका व्यक्तीकडे ४ पेक्षा अधिक बनावट नोटा निघाल्या तर याची तक्रार पोलिसांत देण्यात येते. करन्सीचेस्टमधील व्यवस्थापकाने सांगितले की, पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार बाजारात आजघडीला चलनात असलेल्या ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या नोटा बनावट आहेत.

ज्या बनावट नोटा येतात त्यात १०० रुपयांची नोटही रंगीत झेरॉक्स काढलेली असते, तर ५०० व २ हजार रुपयांची हुबेहूब बनावट नोट असते. पेट्रोलपंपावर गर्दीत नागरिक या नोटा चालविण्याचा प्रयत्न करतात. नजरचुकीने एखाद्याकडून बनावट नोट आली व ती बँकेने स्वीकारली नाही, तर पेट्रोलपंपचा मालक त्या संबंधित कर्मचाऱ्याच्या पगारातून तेवढी रक्कम वजा करतो. यामुळे पेट्रोलपंपावरही कर्मचारी आता सावध झाले आहेत. दररोज हाताळून त्यांनाही असली व नकली नोटा सहज कळत आहेत. फाटक्या नोटा खरेदी करणाऱ्यांनी सांगितले की, नोटाबंदीआधी जुन्या ५०० व १ हजार रुपयांच्या बनावट नोटा मोठ्या प्रमाणात चलनात होत्या. ही समांतर अर्थव्यवस्था मोडीत काढण्यासाठी या मोठ्या रकमेच्या जुन्या नोटांवर बंदी आणली.

# मुंबईला विसरा, आता थेट युरोपात मिळतंय दीड हजारांमध्ये घर!

**मटेरा-** युरोपीय देशांमध्ये विशेषत: इटलीत लग्न करण्याकडे बॉलीवुड कलाकारांचा विशेष ओढा आहे. पर्यटकही फिरण्यासाठी युरोपला अधिक पसंती देतात. एकीकडे सुंदर शहरांसाठी प्रसिद्ध असलेल्या युरोपात एक शहर असेही आहे ज्याला 'सिटी ऑफ शेम' असं म्हटलं जातं. या शहराचं खरं नाव 'मटेरा' असं आहे. पण भुकबळी, रोगराई आणि इतर कारणांमुळं हे शहर बदनाम झालं आहे. या शहराचं रुप आता पुरतं पालटलं आहे. या देशातील नागरिकत्वही अगदी एक-दीड हजारात मिळत असून, घरांच्या किमती तर मुंबईपेक्षाही स्वस्त आहेत. 'मटेरा' हे शहर जगातील सर्वात जुन्या शहरांपैकी एक आहे. एकेकाळी वैभवसंपन्न असलेल्या भागातील या शहरात आज वीज नाही, पाण्यासाठी वणवण करावी लागते. या ठिकाणी आजही अनेक गुहा आहेत. यामुळं शहराला अंडरग्राउंड सिटी असंही म्हणतात. आधुनिक जगापासून दूर असलेल्या या शहरातील गुहेत लोक रहायचे. ते जंगली फळं खाऊन भीक भागायचे.



दक्षिण इटलीच्या एका टोकाला असल्याने इथं कोणत्याही सुविधा नव्हत्या. ८० ते ९० च्या दशकात हे शहर एवढं बदनाम झालं की त्याला 'सिटी ऑफ शेम'च्या नावानं ओळखण्यात येऊ लागलं. लोक गुहेत राहू लागले होते. त्यांचा आधुनिकता आणि विकास यांच्याशी काहीच संबंध नव्हता.

१९५० नंतर 'मटेरा'तील लोकांनी स्थलांतर करण्यास सुरुवात केली. त्यानंतर काहीच वर्षांमध्ये ३० हजार लोकांनी 'सिटी ऑफ शेम' सोडलं. जे काही लोक तिथं होते त्यांनी त्याच अवस्थेत राहणं पसंद केलं.

काही काळानंतर इथल्या प्राचीनतेमुळं या शहराकडं चित्रपट निर्मात्यांची नजर वळली. या ठिकाणी अनेक चित्रपटांचं चित्रीकरण झालं. पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळं सरकारनं याच्या विकासाकडं लक्ष देण्यास सुरुवात केली. त्यानंतर परदेशी पर्यटकांनाही या ठिकाणाचं आकर्षण वाटू लागलं. युनेस्कोने १९९३ मध्ये या शहराचा समावेश जागतिक वारसा स्थळात केल्यानंतर इथली परिस्थिती सुधारली.

# मुंबई महानगरपालिकेत १० रुपयांत जेवणाची थाळी

**मुंबई-** विधानसभा निवडणुकीआधी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेचे सरकार आले तर १० रुपयांत सर्वसामान्यांना थाळी देण्याचे आश्वासन दिले होते. आता ही थाळी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेमध्ये १९ डिसेंबरपासून १० रुपयांच्या थाळीची सुरुवात करण्यात आली आहे.



उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात दहा रुपयांत थाळीची घोषणा केली होती. ही थाळी कधीपासून उपलब्ध होणार याबाबत चर्चा सुरु असताना पालिकेच्या कॅन्टिनमध्ये १० रुपयांत जेवणाची थाळी सुरु करण्यात आली आहे. या जेवणाच्या थाळीमध्ये दोन चपात्या, भात, डाळ आणि दोन भाज्या असा आहार असणार आहे. परंतु ही थाळी केवळ महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी सुरु करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतर ही घोषणा प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. महागाई लक्षात घेता दहा रुपयांच्या थाळीसाठी प्रत्यक्षात जवळपास ५० रुपयांचा खर्च येणार आहे. उर्वरित ४० रुपयांचे अनुदान राज्य सरकारकडून उपलब्ध करून देण्याचा मुद्दा या प्रस्तावात असल्याची माहिती मिळत आहे. या प्रस्तावाची व्यवहार्यता तपासून तो लवकरच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येणार आहे.

दरम्यान, नागपूरात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. अधिवेशन सुरु असताना विधानभवनाच्या अवती-भोवती ५ ठिकाणी स्टॉल लावण्यात आले आहेत. नागपूर पोलिसांनी बंदोबस्तासाठी आलेल्या हजारो पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी १० रुपयांची खास थाळी सुरू केली आहे. चपाती, भाजी, भात, मिठाई आणि सलाड असं या थाळीचं स्वरूप आहे.

# महाराष्ट्राने पाहिला दीड महिना बिनपैशांचा तमाशा -राज ठाकरे

**पुणे-** पुण्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दोनदिवसीय राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन



करण्यात आले असून राज्यातील राजकीय घडामोडींवर आणि पक्ष विस्तारीकरणाच्या दृष्टीने चर्चा केली जात आहे. या शिबिरात राज्यातील मनसे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले की, मागील दीड महिन्यापासून बिनपैशांचा तमाशा राज्यात सुरू असून त्यावर कार्यकर्त्यांकडून सविस्तर माहिती घेऊन बैठकीत चर्चा करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर भूमिका शनिवारी पत्रकार परिषद घेऊन मांडणार आहे. मनसेच्या बैठकीत शुक्रवारी जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, पदाधिकारी यांचे शिबिर पार पडले. पक्षबांधणीसह इतर विषयांवर राज ठाकरे यांनी त्यांना मार्गदर्शन केले. या शिबिराला मनसेचे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, अविनाश अभ्यंकर, राज ठाकरे यांचा मुलगा अमित ठाकरे आदी उपस्थित होते. शनिवारी मनसेचे सरचिटणीस आणि पदाधिकारी यांची बैठक डेक्कन जिमखाना येथे होणार असून त्यापूर्वी राज ठाकरे पत्रकारांशी संवाद साधून राज्यातील राजकीय घडामोडींवर माहिती देतील.

# राहुल गांधी फालतू माणूस, राजकारणात आले हे देशाचं दुर्दैव -संभाजी भिडे

**सातारा-** शिवप्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक संभाजी भिडे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका करत फालतू माणूस असा उल्लेख केला आहे. कोल्हापुरात प्रसारमाध्यमांशी सुधारित नागरिकत्व कायद्यासंबंधी बोलताना त्यांनी



राहुल गांधींवर टीका केली. 'त्या फालतू माणसाबद्दल विचार करून राष्ट्राने आणि आपण आपला वेळ वाया घालवू नये. त्यांचा विचारसुद्धा करु नका. ज्यांना काही उंचीच नाही अशी माणसं राजकारणात आली हे देशाचं दुर्दैव. नाव घेण्यात सुद्धा वेळ दवडू नये,' असं संभाजी भिडे यांनी म्हटलं आहे. यावेळी संभाजी भिडे यांनी नागरिकत्व कायद्याला समर्थन करताना विरोध करणारे देशद्रोही असल्याचं म्हटलं आहे. 'आपला देश माणसांचा आहे, पण देशभक्तांचा नाही हे दुर्दैव आहे. स्वार्थ हाच धर्म असणारे कायद्याला विरोध करत आहेत. या कायद्यामुळे काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत प्रत्येत भारतीयाला आनंद झाला पाहिजे.

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com
मानवाधिकार बातमी
संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS
महानगर समाचार
संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS
SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)
Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Annapurna Caterers
अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474
पोलिस बातमी पत्र
आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)